। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २४८ वा । शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## मुंबईसाठी महायुतीचा फॉर्म्युला निश्चित



**मुंबई/प्रतिनिधी : आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेनेत जागावाटपासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरु आहेत. या चर्चेअंती आता भाजप आणि शिंदे सेनेच्या मुंबईतील जागावाटपाचा नवा फॉर्म्युला समोर आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबई महापालिका निवडणूक २०२६ साठी महायुतीचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी भाजप १४० आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना ८७ जागा लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. या महापालिकेमध्ये महायुतीतील अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार आहे. त्यामुळे भाजप आणि शिवसेना मिळून २२७ जागा लढवणार आहेत. याबाबतची अधिकृत घोषणा आता कधी होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**



यापूर्वी जागावाटपाच्या पहिल्या बैठकीत भाजपने मुंबईत शिंदे गटासाठी फक्त ५२ जागा सोडण्याची तयारी दाखवली होती. मात्र, ठाकरे बंधूंच्या युतीनंतर भाजपने आता शिवसेनेला जास्त जागा देऊ केल्या होत्या. परंतु, जागावाटपच्या या सूत्रावर अधिकृतरित्या शिक्कामोर्तब कधी होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपकडून अद्याप एकही उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. बंडखोरी टाळण्यासाठी भाजपकडून वेट ॲंड वॉच धोरण अवलंबण्यात आल्याची चर्चा आहे. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, मिरा भाईंदर, पनवेलमधील जागावाटपाचा पेच कायम आहे. उद्यापर्यंत या सर्व ठिकाणचे जागावाटप पूर्ण होईल, अशी माहिती भाजपमधील सूत्रांनी दिली आहे. आशियातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळख असणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली आहे. मुंबईसह राज्यातील एकूण महापालिकांमध्ये १५ जानेवारी २०२६ ला मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकूण २२७ प्रभागांसाठी मतदान होणार आहे. मुंबई महापालिकेचा कार्यकाळ ७ मार्च, २०२२ रोजी संपुष्टात आला. तेव्हापासून मुंबई महापालिकेवर प्रशासक आहे. मुंबई महानगरपालिकेची मागील निवडणूक २०१७ रोजी झाली होती. यावेळी शिवसेनेच्या किशोरी पेडणेकर महापौर म्हणून कार्यरत होत्या.

**मुंबई निवडणूक २०१७ चे पक्षीय बलाबल– २२७ नगरसेवक**

शिवसेना– ८४

भाजपा– ८२

काँग्रेस– ३१

राष्ट्रवादी काँग्रेस– ९

मनसे– ७

समाजवादी पक्ष– ६

एमआयएम– २

अपक्ष– ५

**मुंबई महानगपालिका २०२६ साठी निवडणूक कार्यक्रम**

- नामनिर्देशन– २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर
- नामनिर्देशन पत्राची छाननी– ३१ डिसेंबर
- उमेदवार मागे घेणे– २ जानेवारी २०२६ पर्यंत
- अंतिम यादी आणि चिन्ह– ३ जानेवारी २०२६
- मतदान– १५ जानेवारी २०२६
- मतमोजणी/निकाल–१६ जानेवारी २०२६

## लातूरकर ठरविणार काँग्रेसचा जाहिरनामा

### 88303 40097 क्रमांकावर व्हॉटसॲपद्वारे सूचना कराव्यात



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा काँग्रेस कमेटीच्यावतीने ''तुमची सूचना मोलाची... उभारणी करेल नव्या लातूरची'' या संदेशासह लातूरकरांचा सहभाग वाढवण्यासाठी 'लातूरकरांचा जाहीरनामा' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे आयोजन लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांकडून थेट सूचना घेऊन लातूरच्या भविष्यातील विकासाची दिशा ठरवण्याचा हा अभिनव लोकशाही प्रयोग ठरणार आहे. या मोहिमेअंतर्गत लातूरच्या विकासासाठी नागरिकांनी आपल्या सूचनांचा सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले असून, ८८३०३ ४००९७ या क्रमांकावर Whats-App द्वारे सूचना पाठविता येणार आहेत. ''सूचना द्या - सहभागी व्हा–लातूर घडवा'' या घोषवाक्याखाली चालू असलेल्या या मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

या उपक्रमातून अपेक्षित प्रमुख मुद्दे असे आहेत. पाणी, स्वच्छता व पायाभूत सुविधांची सुधारणा रस्ते, वाहतूक व शहर व्यवस्थापन सुलभ करणे, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात दर्जेदार सुविधा, युवकांसाठी रोजगार व उद्योजकतेच्या संधी, महिलांसाठी सुरक्षा व सक्षमीकरण, स्वच्छ, हिरवेगार व स्मार्ट लातूर घडविणे.

या बाबत लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने स्पष्ट केले आहे की, नागरिकांकडून येणाऱ्या सूचनांचे बारकाईने विचार करून त्यावर आधारित एक सर्वसमावेशक, वास्तववादी आणि लोकाभिमुख जाहीरनामा तयार केला जाणार आहे. लातूरचा विकास केवळ घोषणांवर नव्हे, तर लातूरकरांच्या प्रत्यक्ष सहभागातून साध्य व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे सांगण्यात आले.

लातूरच्या विकासासाठी सर्वांनी उत्साहाने पुढे येऊन सूचना द्याव्यात, सहभागी व्हावे आणि लातूर घडवण्याच्या प्रक्रियेत आपला थेट वाटा उचलावा, असे आवाहन लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने केले आहे.

## शिवसेनेतील अनेक पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश; पक्षाला नवी ताकद मिळाल्याचा दावा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील शिवसेनेचे ॲड. बळवंतजी जाधव, कल्पनाताई बावगे यांसह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला. सन्माननीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेशामुळे लातूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वाचे बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

या प्रवेशावेळी उपस्थित नेत्यांनी नवी ऊर्जा, नवी दृष्टी आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द याच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खरी ताकद आहे, असा विश्वास व्यक्त केला. नव्याने दाखल झालेल्या पदाधिकाऱ्यांमुळे पक्ष अधिक सक्षम होईल आणि जनतेच्या प्रश्नांसाठी लढण्याची ताकद आणखी वाढेल, असेही यावेळी सांगितले गेले.

लोकहित, विकास आणि सर्वांगीण प्रगतीच्या विचारांनी प्रेरित होऊन सर्व कार्यकर्ते निष्ठेनं काम करतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रवेशामुळे आगामी राजकीय घडामोडींना वेग येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

## पोलिसांच्या त्रासाला कंटाळून तरुणाने संपवले जीवन!

### हजारो नागरिकांचा पोलिस ठाण्यासमोर ठिय्या

**लातूर/प्रतिनिधी :** औराद शहाजानी येथील पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक व वाहनचालकाच्या त्रासाला कंटाळून आपण आत्महत्या करीत असल्याचा व्हिडीओ तयार करून तो सोशल मीडियावर टाकून एका २२ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी संबंधित पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यावर मरणास कारणीभूत ठरत असल्याने त्यांच्या गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी नातेवाइकांसह हजारो नागरिकांनी पोलिस ठाण्यावर मोर्चा काढला. रात्री उशिरापर्यंत नातेवाइकांचा ठाण्यासमोर ठिय्या होता. समजलेली माहिती अशी की, औराद येथील इमरान खलीलमिया बेलुरे (वय २२) हा सन २०२२ साली येथील व्यापाऱ्याच्या दुकानात मुनीम होता. त्यांच्याच घरी चोरी झाल्याच्या गुन्ह्यात संशयित आरोपी असल्याने अटक झाली होती. त्यानंतर या गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त व तपास पूर्ण करण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर औराद येथील पोलिस ठाण्याचे अधिकारी, पोलिस कर्मचारी हे सतत संबंधिताच्या घरी रात्री-अपरात्री जाऊन त्रास देत असल्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून व्हायरल झाला आहे. संबंधित इमरान बेलुरे याने तेरणा नदी पात्राच्या शेजारी शासकीय वनीकरणांमध्ये झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी औराद परिसरामध्ये पसरली. घटनास्थळी मोठ्या संख्येने नातेवाईक व समाज बांधव जमले. पोलिस स्टेशनवर आलेल्या या जमावाला औसा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी के. बी. चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलिस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक आर. के. डमाळे यांनी चर्चा करून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. रात्री ११ वाजेपर्यंत याप्रकरणी कसलीच नोंद पोलिस ठाण्यात नव्हती.

**मध्यरात्रीपर्यंत प्रेत झाडावरच**

जोपर्यंत संबंधित पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत प्रेताचा पंचनामा व प्रेत खाली उतरविण्यास विरोध जमावाने विरोध केला. त्यामुळे मध्यरात्रीपर्यंत संबंधित आत्महत्या केलेल्या तरुणाचे प्रेत झाडालाच लटकत राहिलेले होते.

यावेळी पोलिस ठाण्यासमोर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला.



**गुन्हा दाखल!**

पोलिस उपअधीक्षक कुमार चौधरी म्हणाले, या प्रकरणांमध्ये प्रथम आकस्मिक गुन्हा नोंद केला जाईल. त्यानंतर नातेवाइकांनी दिलेल्या जवाबानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल. यासाठी अगोदर मृतदेह काढावा लागेल, पंचनामा करू, त्यानंतर पुढील प्रक्रिया केली जाईल. असे सांगितल्याचे समजते.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**रेल्वे प्रवास महागला, रेल्वेची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू...**

### चिमटा दयाचा



**लातूरच्या महानगरपालिकेच्या निवडणूक कार्यक्रमामुळे शहरात कचऱ्याचे ढीग व बेशिस्त पार्किंगमुळे जनतेला त्रास होत आहे ! कामाच्या व्यापामुळे दुर्लक्ष होत आहे !!**

## मांजरा साखर कारखान्यात नविन ३० टनी बॉयलरची उभारणी

### – गाळप क्षमतेत वाढ शेतकऱ्यांना होणार मदत – मांजराचे एक पाऊल पुढे




**लातूर/हरिराम कुलकर्णी :** राज्यांतील सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या नवनवीन तंत्रज्ञान वापरत मांजरा परिवारातील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या ३० टनी नवीन बॉयलरचा अग्नी प्रदीपन समारंभ कारखान्याचे चेअरमन राज्याचे माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या शुभ हस्ते गुरुवारी संपन्न झाला

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे कारखान्याचे संचालक शंकर बोळंगे संचालक श्रीकृष्ण काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई खाते प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते तत्पूर्वी कारखान्याचे चीफ अकाउंटंट श्री व सौ शरद साळुंखे यांच्या हस्ते सपत्नीक पूजा करण्यात आली. मांजरा कारखान्याने गाळप क्षमतेत वाढ केली असून कारखान्याच्या आसवणी प्रकल्पामध्येही वाढ केली आहे त्यासाठी नवीन ३० टनी बॉयलरची उभारणी करण्यात आली असून यामुळे शेतकऱ्यांचा ऊस गाळप लवकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

**चालु गाळप २ लाख ४३ हजार मेट्रिक टन**

मांजरा साखर कारखान्याने आज अखेर २,४३,२२० मॅट्रिक टन उसाचे गाळप केले असून १,७७,३५० क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. तर ८६,४२०० के डब्ल्यू एच विजेची निर्यात केली असून, ३३,८६,०९८ लिटर इथेनॉलचे व ३७,३३,८२८ लिटर स्पिरिट चे उत्पादन झाले आहे. कारखान्याने यावर्षी ९ लाख मॅट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून त्यादृष्टीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रशासन, सन्माननीय संचालक मंडळ प्रयत्न करीत आहे.



